# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.४०७ /२३ /त.क्र.४५ /२६/०१**

श्री.अमित शिंदे

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि/पूर्व) डी विभाग
बृ.मुं.म.पा.सहा.आयुक्त डी विभाग कार्यालय,
महापालिका कार्यालय इमारत, २ रा मजला,
जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई-४०० ००७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता डी विभाग
बृ.मुं.म.पा.सहा.आयुक्त डी विभाग कार्यालय,
महापालिका कार्यालय इमारत, २ रा मजला,
जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई-४०० ००७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०२.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

तक्रारदार श्री.शिंदे यांनी याआधी दाखल केलेल्या तक्रार क्रमांक ०६/२२/०१ यावर दिनांक ०१.०४.२०२२ रोजी याआधीच आदेश निर्गमित करण्यात आले असून प्रस्तुत तक्रार ही तक्रार अर्जावर दाखल तक्रार असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते.

प्रस्तुत आदेशात माहिती उपलब्ध नसल्याबाबत एक नोंदणीकृत शपथपत्र देण्याचे निर्देश देण्यात आले होते व त्याची एक प्रत आयोगास देखील देण्यात आली होती.

याप्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र देखील सादर केले असल्याचे तक्रारदार यांनीच त्यांच्या उपरोक्त तक्रार अर्जात नमूद केले असून दिलेले प्रतिज्ञापत्र हे असमाधानकारक असल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०१.०४.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०२.२०२६**